MHRG120004362025

**Civil M.A./29/2025**

**VIBHAVARI PRAMOD DEV AND 2 Vs. No One**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २९/२०२५ मधील नि.१ कडील आदेश**

प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन,१८२७ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, **अर्जदार क्र.१ विभावरी प्रमोद देव यांचे पती, अर्जदार क्र.२ प्रियांका प्रमोद देव लग्नानंतरचे नाव प्रियांका सिध्दार्थ आठलेकर व अर्जदार क्र.३ कांचन प्रमोद देव** हयांचे वडील **प्रमोद केशव देव** हे दिनांक १८.०६.२०२५ रोजी मौजे नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे मयत झाले असल्याने त्यांचे नावे कागदोपत्री दाखल असलेल्या शासकीय व निमशासकीय पुराव्यांकरीता वारस म्हणुन अर्जदार क्र.१ ते ३ यांचे नावांची नोंद होणकरीता म्हणून त्यांनी प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदार यांनी निशाणी क्र. ८ कडे जाहिरनामा, निशाणी क्र. १२ कडे वृत्तपत्रातील जाहीर नोटीसची प्रत, निशाणी क्र. १३ कडे प्रमोद केशव देव यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत इत्यादी दाखल केले आहे. याशिवाय निशाणी क्र. ११ कडे अर्जदार क्र १ चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. वृत्तपत्रातून जाहिर प्रगटन आणि जाहीरनामा द्वारे प्रस्तुत अर्जाबाबत प्रसिध्दी देवून आक्षेप मागविण्यात आले, परंतू कोणीही आक्षेप नोंदविला नाही. अर्जदार यांनी प्रतिज्ञालेखात केलेल्या कथनावरुन व अभिलेखावर दाखल केलेल्या दस्ताऐवजावरुन प्रमोद केशव देव यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही वारस नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अर्जदार हेच औपचारीकरित्या वारसदार म्हणून घोषीत करणे आवश्यक आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो–

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ विभावरी प्रमोद देव, अर्जदार क्र.२ प्रियांका प्रमोद देव लग्नानंतरचे नाव प्रियांका सिध्दार्थ आठलेकर व अर्जदार क्र.३ कांचन प्रमोद देव हेच मयत प्रमोद केशव देव यांचे वारस असलेबाबत योग्य ती कोर्ट फी आकारुन बॉम्बे रेग्युलेशन, १८२७ नुसार वारस दाखला जारी करण्यात यावा.

GHANSHAM RAMLAL TIWARI Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI Date: 2026.04.04 11:01:23 +0530

मुरुड
दिनांकः ०१.०४.२०२६

(घन:शाम रा.तिवारी)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मुरुड जि. रायगड–अलिबाग